# मिरा-भाईंदर महानगरपालिका

// प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात सुरु असलेले कॉक्रीट रस्ते, नाले, इमारती दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती कामांच्या कंत्राटदार यांच्यावर सुरु केली दंडात्मक कारवाई

मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी विविध उपयायोजना करण्याचे धोरण ठरविलेले आहे.

सदर धोरणात महानगरपालिकेच्या विकास कामाठिकाणी व रस्ते दुरुस्ती, शाळा दुरुस्ती कामे, शोभिवंत रेलिंग बसविणे इ. ठिकाणी खोदाई करुन निघणारी माती, डेब्रिज उचलणे व रस्ते वाहतुकीसाठी मोकळे व स्वच्छ ठेवणे साठी शास्तीची रक्कम ठरविलेली आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईदर महानगरपालिकेचे मुन्शी कंम्पाऊंड, दिपक हॉस्पीटल रस्ता, टाऊन पार्क, गोल्डन नेस्ट, घोडबंदर सर्व्हे क्र.233 येथील नाला, पुनम गार्डन ते सालासर, भाईंदर (पुर्व) ओसवाल ते श्वेता पार्क इ. रस्त्यांवर डेब्रिज आढळल्याने कंत्राटदार यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे.

मिरा भाईदर महानगरपालिका यापुढे देखिल रस्त्यावर डेब्रिज, माती व बांधकाम साहित्य कामाठिकाणी आढळल्यास दंडात्मक कारवाई सुरु ठेवणार आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2025-26/DK/AD-6